Date : 25-Mar-2010 Edition : Mumbai Page No.: 5 Page Name: Arthachakra Size: 90.67 sq. cm

Sector: FMCG Circulation: 181308 AVE: INR 0.00 Frequency: Daily

Publication: Lokmat Title: Pepsicoâ€™s agreement with Farmers for potatoes

# Lokmat

## पेप्सीकोचे बटाट्यासाठी १२ हजार शेतकऱ्यांशी करार

कोलकाता, दि. २४ (प्रतिनिधी) - लेज, अंकल चिप्सच्या खड्ड्यामिठ्या चवीवर भारतीय ग्राहक जाम खूश असून या दोन्ही ब्रँडच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यामुळे उत्पादक पेप्सीको कंपनीने दर्जेदार बटाट्यांचे उत्पादन घेण्यासाठी देशभरातील १२ हजार शेतकऱ्यांशी करार केले आहेत.

### प्रतिकिलो सहा रुपये दराचा दावा

या दोन्ही ब्रँडची मागणी वाढल्याने त्यासाठी आवश्यक बटाट्याचे उत्पादन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी देशभरातील १२ हजार शेतकऱ्यांशी करार केले असून त्या माध्यमातून सुमारे १६ हजार एकरवर बटाट्याचे पीक घेण्यात आले आहे. यामधील साडेसहा हजार एकर क्षेत्रफळ एकट्या पश्चिम बंगालमध्ये आहे, अशी माहिती पेप्सीकोच्या कृषी व्यवसाय विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष निश्चिंत भाटिया यांनी दिली. पेप्सीकोचे बटाटा उत्पादनाचे कार्यक्षेत्र वाढू लागले आहे. करार पद्धतीने शेती घेऊन तसेच शेतकऱ्यांना प्रशिक्षित करून दर्जेदार बटाट्याचे उत्पादन घेण्यावर कंपनीचा भर राहिला आहे. गेल्या हंगामात कंपनीने २२ हजार टन एवढ्या बटाट्याची खरेदी केली होती, असेही भाटिया म्हणाले.

आम्ही शेतकऱ्यांकडून प्रतिकिलो सहा रुपये दराने बटाट्याची खरेदी करतो. हा दर बाजारभावापेक्षा जास्त आहे. सध्या कंपनी केवळ बटाट्याच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांशी करार करीत असली तरी भविष्यात जवाच्या उत्पादनासाठीही करार केले जातील. कंपनी क्वेकरसाठी परदेशातून जवाची आयात करते. भारतात जवाची शेती कशा पद्धतीने करता येईल, यासाठी काही कृषी विद्यापीठांशी सल्लामसलत सुरू असल्याचेही भाटिया यांनी सांगितले.



© Lokmat www.lokmat.com